# विस्तार शिक्षण संचालनालय
# मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विस्तार शिक्षण उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल

मराठवाडा कृषि विद्यापीठ, भारतीय कृषि अनुसंधान परिषद व इतर पुरक संस्थानी केलेले समस्याभिमुख कृषि संशोधन शेतक-यांपर्यत पोहचविण्याचे कार्य विस्तार शिक्षण संचालनालयाच्या मार्फत पार पाडण्यात आले आहे. या साठी जाणीवपुर्वक प्रयत्न करून विस्तार शिक्षण संचालनायाचे अनेक अभिनव विस्तार शिक्षण उपक्रम राबवून आपले संशोधन खेडोपाडी पोंहचविण्याचे प्रमाणिक प्रयत्न केले आहेत. हे नवनविन कषि तंत्रज्ञान शेतक-यांनी अवलंबीले आहे. मराठवाडा कृषि विद्यापीठाने खालील योजनांच्या माध्यमानतुन कृषि संशोधन शेत-यांपर्यत पोहचविण्याचे कार्य पार पाडले आहे. या विस्तार उपक्रमांची संक्षिप्त माहिती खाली देण्यात आली आहे.

**कृषि विस्तार शिक्षण विभाग**

मराठवाडा कृषि विद्यापीठात विस्तार कार्याची मुहूर्त मेढ ही सन १९५६ साली परभणी येथे स्थापना करण्यात आलेल्या कृषि महाविद्यालयापासुन झाली. कृषि पदवीसाठीच्या एकुण ९ विषयापैकी कृषि विस्तार या विषयासाठी कृषि विस्तार विभागाची स्थापना झाली. या विभागाच्या आंतर्गत कृषि विस्तार कार्यासाठी १९५८ साली परभणी तालुक्यातील जवळच्या दहा गावांचा एका समुहाची निवड करून विस्तार शिक्षण गट स्थापन करण्यात आला. निवडक दहा गावांमध्ये शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी पी प्रात्यक्षिके, प्रक्षेत्र भेटी व शेतकरी मेळावे आदिचे आयोजन केल्या गेले. तसेच कृषि महाविद्यालयातील विद्यार्थी दहा दिवस निवडक खेडयामध्ये शेतातच वास्तव करून सदर खेडयातील शेतक-यांना विस्ताराच्या विविध पध्दतीचा वापर तसेच मनोरंजकात्मक कार्यक्रम आयोजित करून कृषि विस्ताराचे कार्य करीत असत. विस्तार शिक्षण विभागात पदवीधर आणि आचार्य पदवीपर्यंत शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात. कृषि विस्तार शिक्षणाच्या या वाटचालीत १८ मे १९७२ साली मराठवाड कृषि विद्यापीठाची स्थापना झाली व या कृषि विद्यापीठांतर्गत कृषि विस्ताराचे कार्य करणारे कृषि महाविद्यालय, परभणी हे पहिले महाविद्यालय आहे.

**विस्तार शिक्षण योजना**

कृषि विद्यापीठांतर्गत १९७५ साली विस्तार शिक्षण योजना ची सुरूवात झाली या योजनेच्या कार्यान्वयामुळे मराठवाडयातील तत्कालीन पाच जिल्हयासाठी विस्तार शिक्षणाच्या कक्षा रुदावल्या. या योजनेंतर्गत

१. शेतक-यांच्या शेतावर पीक प्रात्यक्षिके आयोजित करणे.
२. शेतकरी मेळावे, शेतीदिन, परिसंवाद, गटचर्चा, प्रक्षेत्र भेटी इ. चे आयोजन करणे.
३. कृषि प्रदर्शनाद्वारे कृषि विद्यापीठात होणा-या संशोधनाची माहिती देणे आकाशवाणीद्वारे शेतक-यांना माहिती देणे, कृषि कार्यक्रमाची आखणी करणे.
४. विविध विषयावरील पुस्तीका, घडीपत्रिका आदि प्रकाशित करणे व शेतक-यांच्या कृषि विषयक प्रश्नांना उतरे देणे.
५. कृषि विभागाचे अधिकारी, शेतकरी, महिला, युवक, युवती, सुक्षिक्षीत बेकार यांना प्रशिक्षण देणे.

वरील प्रमाणे कार्य टप्या टप्याने व गरजेप्रमाणे सुरू करण्यात आली. व आज ही कार्य सक्षमपणे चालु आहेत.

**विद्यापीठ मुद्रणलयाची स्थापना**

विस्तार शिक्षण योजनेच्या स्थापनेबरोबरच मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत विद्यापीठ मुद्रणालयाची स्थापना झली. सुधारित वाणाची आणि लागवड तंत्रज्ञानाची जाणीव होण्याच्या दृष्टीने छापील प्रकाशनाचा फार मोठा उपयोग होतो. नवनविन तंत्रज्ञानाची माहिती प्रकाशनाद्वारे शेतक-यांना देवून त्यांच्यामध्ये तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची जाणीव निर्माण करता येते. व हेच तंत्रज्ञान अंगीकाराचे पहिले पाउल आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांना या मुदणालयातून सामायीक संदेश या घडीपत्रिकेद्वारे नविन तंत्रज्ञान व महिन्यावारी शेतातील करावयाची कामे याची माहिती देण्यास सुरूवात झाली. पुढे साधारणः १९८० च्या काळात याच घडीपत्रिकेचे शतीभाती मासीकात रूपांतर झाले.

राष्ट्रीय प्रात्यक्षिक योजना (NDS)

सन १९७६ साली राष्ट्रीय पीक प्रात्यक्षिके योजना अस्तित्वात आली. या योजनेंतर्गत मराठवाडयातील खरीप व रबीच्या महत्वाच्या पिकाची पीक प्रात्यक्षिके घेण्यात आली. या योजनेत कृषि विद्या, कृषि मृदशास्त्र, किटकशास्त्र, वनस्पती विकृतिशास्त्र या महत्वाच्या विषयाचे शास्त्रज्ञ एकत्रितपणे सहभागी होत. राष्ट्रीय कृषि प्रात्यक्षिक योजनेनंतर कृति संशोधन प्रकल्प (Opeational Research Project) राबविण्यात आले. यामध्ये अदिवाशी शेतक-यांसाठी विकास योजना किनवट जिल्हा नांदेड येथे तर अनुसूचित जाती जमातीसाठी शेतकरी विकास योजना, आंबाजोगाई जिल्हा बीड येथे शेतक-यांच्या विकासासाठी शेतीसंबधी कृषि विस्ताराचे विविध कार्यक्रम राबवण्यिात आले.

**विस्तार शिक्षण संचालनालयाची स्थापना**

महाराष्ट्रात सन १९८१ साली विस्तर शिक्षण अधिक सदृढ करण्यासाठी प्रशिक्षण व भेट योजनेची सुरूवात झाली. आणि याच योजने अंतर्गत मराठवाडा कृषि विद्यापीठातील आजच्या विस्तार शिक्षण संचालनालयाची स्थपना परभणी येथे झाली. संचालक, विस्तार शिक्षण यांच्या अधिपत्याखाली सन १९८१ पासुन संपूर्ण मराठवाडयासाठी कृषि विस्तार कार्याच्या कक्षा रूंदावण्यात आल्या. विस्तार शिक्षण यांच्या अधिपत्याखाली चार विस्तार कृषि विद्यावेत्ता अनुक्रमे परभणी, अंबेजोगाई, औरंगाबाद व लातुर येथे कार्यरत असुन, मराठवाडयातील आठही जिल्हे हे विद्यापीठ कृषि विस्ताराचे कार्यक्षेत्र आहे

**विभागीय कृषि विस्तर शिक्षण केंद्र**

सन २००३ पासुन कृषि विद्यावेत्ता यांच्या कार्यालयाचे बळकटीकरण करून औरंगाबाद, लातुर, परभणी व अंबेजोगाई येथे असे एकूण चार विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. अद्यावत कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यत पोंहचविण्यासाठी या केंद्रामार्फत विविध उपक्रम जसे कृषि विकासासंबधीत सर्व विभाग व इतर सेवाभावी संस्थातील अधिकारी व विस्तार कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा मासिक चर्चासत्र, पूर्व हंगामी प्रशिक्षण, अल्प मुदतीचे प्रशिक्षण वर्ग व उजळणी वर्गाचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे शेतक-यां शेतावर मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध पिकाच्या वाणांची पिक प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. तसेच त्यांचे शेतावर प्रक्षेत्र भेटी आणि निदान चमुच्या भेटी आयोजित केल्या जातात. यामध्ये शेतक-यांच्या शेतामधील उभ्या पिकावर आलेल्या किड व रोगांची दखल घेवून शासनाच्रूज्ञ कृषि विभागाच्या समन्वयाने शेतक-यांच्या शेतावर भेटी देवून मार्गदर्शन व सल्ला देण्यात येतो.

**कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र**

मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे दिनांक १-१-२००० रोजी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राची स्थापना करण्यात आली. या केद्रामुळे विद्यापीठात विकसीत झालेले तंत्रज्ञान, बी-बीयाणे, विक्री, रोपे, व कलमे, विक्री, प्रकाशने विक्री, कृषि औजारे विक्री, प्रशिक्षण, माती तपासणी, पुशुआरोग्य तपासणी पिकावरील किड व रोग निदान व सल्ला इ सुविधा एकाच छत्राखाली शेतक-यांसाठी उपलब्ध झाल्या. कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यत तात्काळ पोंहचविण्यासाठी कृषि माहिती वाहीणी व किसान कॉल सेंटर हे अभिनव उपक्रम या केद्रात सुरू करण्यात आले आहेत.

**कृषि विज्ञान केंद्र**

कृषि विज्ञान केद्राची स्थापना ही खालील मुलभूत संकल्पनेवर आधारित आहे.

१. प्रशिक्षणार्थीना प्रत्यक्ष कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण देणे
२. कृषि विस्तार कार्यकर्ता शेती व शेतीवर आधारित असे स्वंयरोजगार करू इच्छिना-या व्यक्तीस प्रशिक्षण देणे.
३. प्रशिक्षणाचा अभ्यास व कार्यक्रम विशिष्ट विभागातील नैसर्गिक साधन संपत्ती, स्थानिक गरजा आणि त्या परिसरात कृषि विकासाला असलेला वाव या बाबींचा विचार करूण आखणे.

कृषि विज्ञान केंद्रही व्यावसायीक प्रशिक्षण संस्था असुन त्याचा मुळ उद्देश उपलब्ध असलेले आधुनिक तंत्रज्ञान व शेती उत्पादन वाढीसाठी त्याचा अवलंब यामध्ये जी दरी आहे, ती भरून काढणे हे होय.

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अधिपत्याखाली औरंगाबाद व तुळजापुर येथे कृषि विज्ञान केंद्र कार्यरत आहेत. औरंगाबाद जिल्हयांसाठी औरगाबाद येथे तर उस्मानाबाद जिल्हयांसाठी तुळजापुर येथे अनुक्रमे सन १९८३ ते २००० पासुन ही केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. औरंगाबाद येथे कृषि माहिती वाहीनी ही सेवा उपलब्ध आहे. या कृषि विज्ञान केंद्रातून शेती व अनुषंगीक विषयाचे तंत्रज्ञान प्रसाराचे कार्य विविध

उपक्रमाच्या माध्यमातून केले जाते. जसे प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतकरी सहली, शेतकरी मेळावे, शेतक-यांच्या शेतांना भेटी, जैविक घटकांची उपलब्धता, रोगांच्या अनुनामाची माहिती, संगणकाच्या माध्यमातुन शेतक-यांच्या समस्यावर मार्गदर्शन, माती व पाणी तपासणी इतर विविध उपक्रम इत्यादि कृषि तंत्रज्ञान विस्ताराचे प्रशिक्षण हे एक महत्वाचे अंग आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तीन प्रकारची प्रशिक्षणे दिली जातात.

१. शेतकरी महिलांसाठी प्रशिक्षण
२. ग्रामीण युवतीसाठी स्वंयरोजगारक्षम प्रशिक्षण
३. विस्तार कार्यकर्तांसाठी प्रशिक्षण

**शेतकरी महीलांसाठी प्रशिक्षणे**

प्रत्यक्ष शेतात राबणा-या शेतकरी महीलांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. पीक उत्पादन घेत असतांना आधुनिक पीक उत्पादन तंत्रज्ञानाविषयी उदा. पीकाचे पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, बी-बीयाणे निवड, जातीची निवड, पीक संरक्षण, जैविक घटकांचा वापर इ. संदर्भातील विषयावर प्रशिक्षण दिले जाते.

**ग्रामीण युवकांसाठी स्वंयरोजगारक्षम प्रशिक्षण**

तरूण बेरोजगार व युवतींना आपला उद्योग सुरू करता यावा म्हणून त्यांच्यासाठी कुकुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुटीर उद्योग, हस्तकला, शिवणकला, आळंबी लागवड, गांडूळ खत, मधुमक्षिका पालन, रोप वाटीका संगोपन, खाद्य पदार्थ तयार करणे, इ. विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.

**विस्तार कार्यकर्तांसाठी प्रशिक्षण**

कृषि संबधित ग्रामीणस्तरावर काम करणारे कर्मचारी, बीगर सरकारी संस्थातील विस्तार कार्यकर्ते यांना त्यांची गरज लक्षात घेवून अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या दृष्टीने प्रशिक्षणाची आखणी व आयोजन केले जाते.

कृषि विज्ञान केंद्र, औरंगाबाद येथे कृषि व अनुषंगिक विषयार स्थापनेपासुन ३१ मार्च २००९ पर्यंत एकूण ३२६४ महिला प्रशिक्षण वर्ग आयाजित करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गात हजारो पुरूषांबरोबरच २६५३२ स्त्रीयांना प्रशिक्षीत करण्यात आले. त्यामध्ये २७३७ अनुसुचित जाती व जमाती वर्गातील महिलांचा समावेश होता.

**मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी कार्यक्षेत्रातील कृषि विज्ञान केंद्रे**

| अक्र | जिल्हा | संस्था | मुख्यालय |
|---|---|---|---|
| १ | औरगाबाद | मकृवि, परभणी | औरंगाबाद |
| २ | उस्मानाबाद | मकृवि,परभणी | उस्मानाबाद |
| ३ | बीड | दिनदयाळ शोध संस्थान, आंबाजोगाई | आंबाजोगाई |
| ४ | हिंगोली | संत नामदेव सेवाभावी संस्था, हिंगोली | हिंगोली |
| ५ | जालना | मराठवाडा शेती सहाय्य मंडळ जालना | खरपुडी |
| ६ | नांदेड | जवाहरलाल नेहरू इंस्टीटयुट ऑफ एजुकेशन सायन्स, टेक्लालॉजीकल रिसर्च ट्रस्ट नांदेड | नांदेड |
| ७ | परभणी | जीवन ज्योती चारिटेबल ट्रस्ट, परभणी | परभणी |
| ८ | लातूर | मांजरा चारीटेबल ट्रस्ट, लातूर | लातूर |

**ग्रामीण जैव संसाधन प्रकल्प**

भारत सरकारच्या जैव तंत्रज्ञान विभाग भरत सरकारतर्फे मंजुर ग्रामीण जैव संसाधन प्रकल्प विद्यापीठात मौजे करमाड जिल्हा औरंगाबाद येथे १० मे २००५ पासुन कार्यरत आहे. करमाड परिसरातील ७ गावांच्या समुहाचा विविध कृषि जैव संशोधन संपतीचे संधारण व वापर करून गावांचा सर्वांगिन विकास करण्याचा प्रमुख उद्देश आहे.

**उद्देश**

१. निवडलेल्या गावांचा समुहातील लाभार्थ्यांचा सर्वांगिन व शाश्वत विकास घडविण्यात लक्ष ठेवणे
२. ग्रामीण साधनांच्या उपलब्धतेचा आधारावर योग्य तंत्रज्ञानाची निवड करण्यासाठी मदत करणे
३. तंत्रज्ञानाची निवड व वापर वाढविण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाची सोय सुविधा विकसीत करणे

४. लाभार्थ्यांना कृषि व कृषि आधारित व्यावसायीक बनविण्याच्या दृष्टीने त्यांना संबधित व्यवसायातील प्रशिक्षण, प्रात्यक्षिक व विस्तार कार्यक्रम राबविणे.
५. कृषि व कृषि आधिरीत तंत्रज्ञानातील कौशल्याचा विकास करून ग्रामीण जनतेसाठी रोजगार व अर्थाजंनासाठी संधी निर्माण करणे.
६. कृषि उत्पादनास योग्य विपणन व्यवस्था मिळवून देण्यासाठी मदत करणे व उत्पादक आणि ग्राहकामधील दरी भरून काढणे

प्रकल्पांतर्गत बिजोत्पादन, रोपवाटीका, डाळींब लागवड, रेशीम उद्योग,कुक्कुट पालन व शेळी पालन या व्यवसायाची निवड करण्यात आली असुन सातही गावांतील शेतकरी वरील व्यवसायाचे लाभार्थी आहेत.

विस्तार शिक्षण संचालनालय करीत असलेल्या या उपक्रमाची माहीती संक्षेपान येथे देण्यात आली आहे.

**कृषि विस्तार विषयक उपक्रम**

**१. जिल्हा मासिक चर्चासत्र**

जिल्हा मासिक चर्चासत्राद्वारे कृषि विद्यापीठातील विषय विशेषज्ञ हे कृषि विभागाच्या अधिका-यांना संशाधन निष्कर्षावर आधारीत प्रशिक्षण देतात. दर महिन्यात कृषि विभागाच्या अधिका-यां समवेत प्रक्षेत्र भेट आयोजित केली जाते. या भेटीच्या आधारावर कृषि अधिका-यांकडून येणारे प्रत्याभरण याचे शास्त्रज्ञांकडून निराकरण केले जाते. जिल्हा मासिक चर्चासत्रात शेतक-यांना आलेल्या आडचणीचे निराकरण शास्त्रज्ञाकडून केल्या जाते. तसेच अशा चर्चासत्रात उपस्थित करण्यात आलेल्या समस्या सोडविण्यासाठी कृषि संशोधन विभागाशी संपर्क साधला जातो. सुधारीत तंत्राज्ञानाचा प्रसार व अवलंब किती प्रमाणात झाला याची पडताळाणीही या चर्चासत्रात केली जाते.

**२. निदान चमुच्या भेटी**

शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतक-यांच्या शेतावर शास्त्रज्ञ आणि विस्तार कार्यकर्ते यांच्या भेटी तसेच निदान चमुच्या भेटी अयोजित केल्या जातात. शास्त्रज्ञ आणि अधिकारी या भेटीमध्ये शास्त्रज्ञ शेतक-यांच्रज्ञ शेतावर अन्नपिके, फळपिके तसेच जमीन, पाणी, माती याबाबतच्या समस्या कीडी व रोग यांचे निदान करून उपाय योजना सुचवितात.

**३. शेतकरी केळावा**

मराठवाडा कृषि विद्यापीठ, मध्यवर्ती परिसर, विद्यापीठांतर्गत विस्तार/संशोधन केंद्र तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील खेडेगांवात विविध कार्यक्रमाचे औचित्य साधुन अनेक शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने विद्यापीठ वर्धापण दिनानिमीत्य १८ मे रोजी खरीप शेतकरी मेळावा, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी रब्बी शेतकरी मेळावा तर सावित्रिबाई फुले जयंती निमीत्य ३ जानेवारी रोजी महीला शेतकरी मेळाव्याचे दरवर्षी आयोजन करण्यात येतात. शेतकरी मेळाव्यातून विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, विषयतज्ञ शेतक-यांना मार्गदर्शन व त्यांचे शेती विषयक समस्यांचे शंका समाधान करतात. शेतकरी मेळाव्याच्या ठिकाणी विद्यापीठाचे विभाग, खते/ औषधी कंपण्या, बी-बीयाणे कंपण्या व अशासकीय संस्थाचे दालणे उभारून प्रदर्शनाच्या माध्यमातुन शेतक-यांना ज्ञानार्जन होईल असा प्रयत्न केला जातो. तसेच बी-बीयाणे व इतर निविष्ठा, प्रकाशने, शेती औजारे इ.विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच महाराष्ट्र शासनाच्या कृषि खात्यामार्फत व इतर शेती विकासांशी संबधित खात्यामार्फत आयोजित शेतकरी मेळाव्यात विद्यापीठातील शास्त्रज्ञ सहभागी होवून शेतक-यांना मार्गदर्शन करतात.

**४.प्रशिक्षण**

शेतकरी, ग्रामीण युवक, महीला शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार यांना शेती व शेतीवर आधारीत इतर पुरक व्यवसायावर विद्यापीठात तसेच विद्यापीठ परिसराबाहेर प्रशिक्षण वर्ग अयोजित केल्या जातात. तसेच महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे अधिकारी, बिगर संस्थाचे विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी गरजेनुरूप प्रशिक्षणाचे आयोजन केल्या जाते. विद्यापीठामध्ये विस्तार शिक्षण संचालनालय तसेच विविध महाविद्यालये, कृषि विज्ञान केंद्रे विविध संशोधन केंद्रे येथे मोठया प्रमाणावर प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या आहेत. कृषि विभागातील अधिकारी, शेतकरी, महीला शेतकरी व युवक युवती, ग्रामीण कारागिर, भुमिहीन, मागासवर्गीय, महिला बचत गट यांना वेगवेगळया विषयावर मोठया प्रमाणावर प्रशिक्षण दीले गेले त्यात एकात्मिक किड व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जलसंधारण, रेशीम उद्योग, गांडुळ खत निर्मिती, दुग्धव्यवसाय,

कुकुट पालन, मुल्यवर्धी, काढणी पश्चात तंत्रज्ञान, विपणन, कृषि उद्योग मालाची निर्यात पुष्प उत्पादन, भाजीपाला लागवड अशा अनेक विषयावर आतापर्यंत प्रशिक्षण देण्यात आले.

**५. फिरते कृषि चिकित्सालय व कृषि रथ**

विस्तार शिक्षण संचालनालयाने फिरत्या कृषि चिकित्सालयाची स्थापना करून शेतक-यांच्या शेतावर प्रत्यक्ष जावून माती परिक्षण, अन्नद्रव्य व्यवस्थापन, रोग व किड व्यवस्थापन, बिज प्रक्रीया, तण व्यवस्थापन तसेच वेळीच उदभवणा-या कृषि विषयक समस्या शेतक-याच्या ोतावर जावुन सोडवल्या आहेत. कृषि रथाच्या माध्यामातुन मराठवाडयातील सर्वभागात विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध पिकांच्या सुधारित जाती शेतक-याना त्यांचे गावी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळेच सोचाबीन, एमएयुएस-७१, तूर-बीएसमआर-७३६, भेंडी परभणी क्रांती, हरभरा आकाश (बीडीएन-७९६), करडई पीबीएनएस-१२, ज्वारी परभणी मोती, अशा सुधारित वाणांचा प्रसार मराठवाडा विभागात झालेला आहे.

**६. पिक प्रात्यक्षिक व शिवार फेरी**

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर ६५ एकर क्षेत्रावर आदर्श पिक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र स्थापन केले असून तेथे निरनिराळया पिकांचे सुधारित वाण, सुधारित तंत्रज्ञान, जलसंधारण, व सिंचन पध्दती, भाजीपाला व पूष्पउत्पादन इ. प्रात्यक्षिके घेण्यात आली. या प्रक्षेत्रास मराठवाडा व संपुर्ण महाराष्ट्रातुन हजारो शेतकरी भेटी देतात. या माध्यामातून शेतक-यांना विकसीत तंत्रज्ञान व सुधारीत जाती प्रत्यक्ष पहावयास मिळतात.

**७.पीक प्रात्यक्षिके**

मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या वाणांची गुणवत्ता दर्शविण्यासाठी खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात शेतक-यांना शेतावर पीक प्रात्यक्षिकंचे आयोजन करण्यात आले. पीक प्रात्यक्षिकांना वेळोवेळी भेटी देवून विद्यापीठ शास्त्रज्ञानी शेतक-याना मार्गदर्शन केले. विस्तार शिक्षण संचालनालय, विभागीय विस्तार शिक्षण केंद्र, कृषि विज्ञान केंद्र याद्वारे मराठवाडयातील सर्व जिल्यात सुधारित वाण तसेच सुधारित तंत्रज्ञान निवष्ठिाचा वापर यावर मोठया प्रमाणात प्रात्यक्षिके धेतली आहेत. तसेच शेतक-यांच्या शेतावर गटचर्चा व प्रक्षेत्र दिन आयोजित केले आहेत.

**८.कृषि विकासासाठी प्रसार माध्यमांचा वापर**

शेती विषयक माहिती संकलीत करून ती दुरदर्शन आणि आकाशवाणीच्या विविध कार्यक्रमातून प्रसारीत करण्यात येत आहे. विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेत-यांपर्यंत पोहचविण्यामध्ये आकशवाणी व दुरदर्शनचा मोठा वाटा आहे. या माध्यमातून कृषि विषयक कार्यक्रमाचे नियोजन विद्यापीठाच्या सहभागाने केले जाते. या व्यतिरिक्त खाजगी इटिव्ही, स्टार माझा व केबल वाहीनीच्या माध्यमातुन तंत्रज्ञान प्रसाराचे कार्य केले आहे.

**९. कृषि विकासासाठी प्रसिध्दी माध्यामांचा वापर**

विद्यापीठाच्या प्रसारण केंद्रामार्फत शेतक-यांसाठी उपयुक्त अशी कृषि दैनंदिनी व विविध विषयावरील माहिती पुस्तीका प्रकाशित केल्या जातात. तसेच शेतीभाती हे मासिक नियमीत प्रसिध्द केले जाते. विद्यापीठाचे कृषि विषयक कार्यक्रम व घटना यांना विद्यापीठाच्या वार्तापत्रातुन सातत्याने प्रसिध्दी दिली जाते. विविध पिकावरील घडीपत्रिका तयार करून शेतक-यांना विविध कार्यक्रमातून वाटप केल्या जातात. या विद्यापीठातील शास्त्रज्ञाने स्थानिक वर्तमानपत्रातून तसेच अॅग्रोवन दैनिकात अनेक लेख प्रसिध्द करून शेतक-यांपर्यत कृषि तंत्रज्ञान पोंहचविले आहे. विस्तार शिक्षण संचालनालयातर्फे शेतक-यांसाठी विविध कृषि व संलग्न विषयावर सन २००९ पर्यंत प्रकाशित पुस्तिका व घडी पत्रिकाची यादी परिशिष्ट अ मध्ये दिली आहे.

**१०. कृषि प्रदर्शनी**

आधुनिक कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी मराठवाडा कृषि विद्यापीठामार्फत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विविधस्तरावर कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. ही कृषि प्रदर्शने प्रामुख्याने विवध कार्यक्रम जसे, शेतकरी मेळावे, यात्रा, परीसंवाद इ.च्या निमित्ताने आयोजीत केली जातात. महाराष्ट्र शासनाच्या कृषि खात्यामार्फत आयोजित करण्यात येणा-या कृषि प्रदर्शनात विद्यपीठ प्राधान्याने सहभाग नोंदविला. विस्तार शिक्षण संचालनालयातर्फे महाराष्ट्रात तसेच माहराष्ट्राबाहेर आयोजित केलेल्या प्रदर्शनामध्ये सहभागी झाले आहेत, ज्यात भाकृसं, नवि दिल्ली, पश्चिम विभगीय कृषि प्रदर्शन उदयपुर राजस्थान दिसा, जि. बनासकाठा, गुजराथ तसेच कृषि विद्यापीठ, धारवाड,कर्नाटक, डॉ. पंदेकृवि,अकोला. नागपुर, बुलढाणा तसेच पालवी कृषि प्रदर्शन दापोली, अॅग्रोवन,पुणे,किसान,पुणे, नाशीक इ. समावेश आहे.

**११. कृषि माहिती वाहीनी**

कृषि माहिती वाहीनी या उपक्रमांतर्गत दर शुक्रवारी सकाळी ९ ते ११ या वेळात कृषि विषयतज्ञ ०२४५२-२२९००० या दुरध्वणी क्रमांकावर उपलब्ध असतात.या वेळात शेतक-यांनी विचारलेल्या कृषि विषयक प्रश्नांची उत्तरे दुरध्वणी दिली जातात. ही सेवा लातुर व औरंगाबाद येथीत विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्रावरही उपलब्ध आहे. लातूर येथे दर बुधवारी सकाळी ११ ते १ या वेळात (०२३८२)२५९८८८ या दुरध्वणी क्रमांकावर तर औरंगाबाद येथे दर मंगळवारी सकाळी ९ ते १२ या वेळात (०२४०)२३७६५८८ या दुरध्वणी क्रमांकावर कहिलांनी संपर्क साधल्यास त्यांच्या शेतीविषयक समस्याबाबत मार्गदर्शन केले जाते.

केंद्र शासनो दिनांक २१ जानेवारी, २००४ पासुन किसान कॉल सेंटर या उपक्रमांतर्गत शेतक-यांसाठी मोफत कॉल सेवा योजना सुरू करण्यात आलीा आहे. या योजनेतंर्गत शेतक-यांना किसान कॉल सेंटरवरून माहिती देण्यात येते शेतक-यांना विमामुल्य सेवा १९५१ दुरध्वनी क्रंमाकावर उपलब्ध आहे.

**१२ गटचर्चा**

समान प्रश्न येणा-या शेतक-यांच्या गटासाठी आयोजित करण्यात आल्या गटचर्चेमध्ये शेतक-यांच्या समस्यावर चर्चाकरून शंका समाधान करण्यात आले.

**१३. शेतीदिन**

शेतीदिन प्रगतशिल शेतकरी, पीक प्रात्यक्षिके, प्रक्षेत्र भेटी, तसेच संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर आयोजित करण्यात येतात.

**१४. शेतकरी शास्त्रज्ञ विस्तार मंचाची स्थापना**

विस्तार शिक्षण संचालनालयाने शेतकरी शास्त्रज्ञ, विस्तारक मंचाची प्रत्येक जिल्हयात स्थापना केली आहे. त्यात डाळींब उत्पादक गट, मोसंबी उत्पादक गट, केशर आंबा निर्यात गट, पुष्प उत्पादन गट, कापुस उत्पादन समुह, उस उत्पादन समुह, भाजीपाला उत्पादन समुह, सिताफळ उत्पादक गट यांचा समावेश आहे. या मंचाच्या माध्यमातुन शेतक-यांना शेतमाल विक्री, बाजारपेठा काढणी पश्चात तंत्रज्ञान मुल्यवर्धी या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतक-यांच्या संशोधन नियोजनात सहभाग घेतला गेला.

**१५. माहिती तंत्रज्ञानाचा वापर**

तंत्रज्ञानाचा प्रचारासाठी विस्तार शिक्षण संचालनाला, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, व कृषि विज्ञान केंद्रात इंटरनेट सविधा निर्माण केल्या असुन विद्यापीठाच्या संकेत स्थळावर विद्यापीठाचे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच विद्यापीठात व्हिडीओ कॉन्फरंस व स्पर्शपटल सुविधा शेतक-यांच्यासाठी उपलब्ध करून दिली आहे. कृषि तंत्रज्ञान माहिती केद्रात चलचित्र सुविधेच्या माध्यमातुन सुधारित वाण व तंत्रज्ञान शेतक-यांना उपलब्ध करून दिली आहे. विस्तार शिक्षण संचालनालयाने निमित्त इंटरप्रायजेस पुणे, तसेच वनराई संस्था यांचेशी सामंजस्य करार करून शेतक-यांना विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान व तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली आहे. या तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील शेतकरी फायदा घेत आहेत.

**१६. निविष्ठा, रोपे, कलमे विक्री व सेवा**

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या माध्यमातुन विविध फळ पिकांची रोपे, कलमे उतिसंवर्धित रोपे, जिवाणु खते, जैविक उत्पादने, प्रक्रियायुक्त पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ तसेच विद्यापीठाची प्रकाशने विक्री केल्या जाते. अशाच सुविधा कृषि विज्ञान केंद्र व संशोधन संस्था येथेही उपलब्ध केल्या आहेत.

**विशेष उपक्रम**

**१. राष्ट्रीय फलोत्पादन अभियांनाची अमलबजावणी**

फलोत्पादन क्षेत्रात क्षेत्रियस्तरावर काम करणारे महाराष्ट्र शासनाच्या कृषि खत्त्याचे अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षणाची गरज लक्षात घेवून फलोत्पादन क्षेत्रात केंद्र पुरस्कृत मनुष्यबळ विकास योजना २००३-०४ या योजनांतर्गत एक (दिनांक १ ते ७ ऑगष्ट २००५) तर कृषि प्रशिक्षण संस्थाचे बळकटीकरण २००४-०५ या योजनेंतर्गत एक (दिनांक ९ ते ११मार्च २००६) असे दोन प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गात फळबागेतील एकात्मिक किड व्यवस्थापन, निर्यातक्षम फळांच्या उत्पादनासाठी लागवड तंत्रज्ञान, विक्री व्यवस्थापन व विपणन या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले.

**२. कृषि क्षेत्रात महिलांचा अधिक कार्यक्षम सहभागाची अमलबजावणी**

भारतीय कृषी क्षेत्रात महिला महत्वाची कामे, तसेच निर्णायक भुमिका निभावतात. ग्रामीण भारतातील महिला निर्विवादपणे आज भारतीय अर्थ व्यवस्थेला आकार देण्याचे काम करत आहे. कृषि क्षेत्रात काम करणा-या महीलापैकी ३३.२ टक्के शेतकरी महीला आहेत. ४६.१९ टक्के शेतमजुर महिला तर १८.५ टक्के महिला पशु संवर्धन, वनीकरण, फलोत्पादन आणि इतर कृषि क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. शेती व

शेतीव्यवसायाशी निगडीत असलेल्या व्यवसायात महिला स्वंयपूर्ण होण्याच्या दृष्टीने विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशिल आहे. त्यासाठी विस्तार शिक्षण संचालनालय व गृह विज्ञान महाविद्यालय येथे महिलांसाठी मेळावे, प्रशिक्षण वर्ग, परिसंवाद, गटचर्चा आयाजित केल्या जातात. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन महिलांना शेतीशी निगडीत भेडसावणा-या समस्यबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच विविध पिकांच्या लागवड तंत्रज्ञानाबाबत माहिती देण्यात येते.

**३. महाराष्ट्र कृषि उत्पादकता वृध्दी अभियान (महापीक)**

महाराष्ट्र कृषि उत्पादकता वृध्दी अभियान (महापीक) अंतर्गत मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे माहे एप्रिल २००५ मध्ये १ दिवसाची विद्यापीठस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत मराठवाडा विभागातील कृषि खात्याचे विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व इतर पदाधिकारी आणि कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेत विभागातील प्रमुख पिकांच्या कमी उत्पादकतेची कारणे, कृषि विषयक आधुनिक तंत्रज्ञानाच्या ज्या शिफारशी विद्यापीठाने केलेल्या आहेत परंतू त्या शेतक-यांपर्यंत पोहचल्या नाहीत. अशा शिफार्शींचा शोध घेणे व कृषि विताराची पुढील दिशा शेतीशाळा, ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम, प्रात्यक्षिक इत्यादि स्वरूपात कशी राहील या संबधी विस्तृत चर्चा करून कार्य नियोजर करण्यात आले. तसेच या अभियांनांतर्गत आयोजित विभागीय कार्यशाळात आणि जिल्हास्तरिय कार्यशाळात विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सहभाग घेवून मार्गदर्शन केले.

**४. पश्चिम विभागीय कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळावा**

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ३४ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधुन विस्तार शिक्षण संचालनालयान प्रश्चिम विभागीय कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळावा-२००५ दिनांक १८ ते २१ मे, २००५ या कालावधीत आयोजीत करण्यात आला. विस्तार संचालनालय, कृषि मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांच्या सौजन्याने सदरील कृषि प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सदर मेळाव्याकरीता इफको व स्टेट बँक ऑफ हैद्राबाद यांनी सुध्दा प्रायोजक म्हणून विद्यापीछास सहाकर्य केले. सदरील प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली होती. सदरील प्रदर्शनात सहा राज्य जसे राजस्थान, मध्यप्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र, गोवा, छत्तीसगड तसेच दोन केंद्रशासीत प्रदेश जसे दादर नगर हवेली व दमण आणि दिव यांनी सहभाग नोंदविला. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा.ना.श्री. राजेशरावजी टोपे, नगरवि कास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. मा. कृष्णा भोगे, कुलगुरू, मकृवि परभणी, कृषि भूषण आण्णासाहेब बोराडे, खाजदार श्री. तुकारामजी रेंगे पाटील, आमदार श्री.सुरेशरावजी वरपुडकर, डॉ. सी.डी. मायी, अध्यक्ष कृषि शास्त्रज्ञ पिवड मंडळ, नवी दिल्ली श्री. सखारामजी जवादे, अध्यक्ष्ज्ञ, जिल्हा परिषद परभणी यांनी या प्रसंगी शेतक-यांना मार्गदर्शन केले. शेतक-यांना नविन तंत्रज्ञानावर आधारीत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. एक लाखावर शेतक-यांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**५. कृषि तंत्राज्ञान सप्ताह-२००५ मध्ये मराठवाडा कृषि विद्यापीठाचा सहभाग**

महात्मा फूले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दिनांक १० ते १४ ऑक्टोबर २००५ या कालावधीत कृषि तंत्रज्ञान सप्ताह-२००५ साजरा करण्यात आला. या कृषि तंत्रज्ञान सप्ताहात मराठवाडा कृषि विद्यापीठाने सक्रिय सहभाग नोंदविला. मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या दालनास मा.ना शरदचंद्रजी पवार, कृषि मंत्री, भारत सरकार, मा.ना. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.ना. बाळासाहेबजी थोरात, कृषिमंत्री, महाराष्ठ्र राज्य, मा.ना. जयंतरावजी पाटील, अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.ना. विजयरावजी कोलते, उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधना परिषद यांनी भेटी दिल्या. मराठवाडा कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान, गाजर गवताचे जैविक नियंत्रण करणारे मेक्सीकन भुगे, विद्यापीठाने विकसीत केलेले विविध पिकांचे सुधारित वाण याबाबत शेतक-याकडून विचारणा करण्यात आली. विद्यापीठाने विकसीत केलेले विविध पिकांचे सुधारित वाण याबाबत शेतक-यांकडून विचारणा करण्यात आली. विद्यापीठाच्या दालनास जवळपास ८५००० शेतक-यांनी भेटी देवून प्रदर्शनाचा लाभ घेतला. तसेच विद्यापीठाने प्रकाशित केलेली कृषि दैनंदिनी, शेतीभाती मासिक व विविध प्रकाशनांची विक्री या सप्ताहात मोठया संख्येने झाली.

**६. पश्चिम विभागीय कृषि प्रदर्शनात मकृवि परभणीः च्या दालनास द्वितीय पारितोषिक**

इंदिरा गांधी कृषि विद्यापीठ, रायपुर, छतीसगढ येथे पश्चिम विभागीय कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळावा दिनांक १४ ते १७ फेब्रुवारी, २००६ या कालावधीत आयोजित करण्यात आला. या कृषि प्रदर्शनात पश्चिम विभागातील राजस्थान, गुजराथ, महाराष्ट्र, गोवा मध्यप्रदेश, छत्तीसगढ तसेच केंद्रशासीत प्रदेश दादर आणि नगर

हवेली आणि दमण व दिव या प्रदेशांचा समावेश होता. कृषि प्रदर्शनात मराठवाडा कृषि विद्यापीठाचे दालन उभारण्यात आले होते. या दालनास छतीसगढ राज्याचे कृषि मंत्री, मा. नंनकीरामजी कंवर यांनी भेट देवून समाधान व्यक्त केले. मकृविच्या कृषि दालनास पश्चिम विभागीय समुहाचे उत्कृष्ठ प्रदर्शनाचे द्वितीय पारितोषीक स्मृति चिन्ह तसेच प्रशस्तीपत्र देण्यात आले. या कृषि प्रदर्शनाचा जवळपास ६० हजार शेतक-यांनी लाभ घेतला.

**७. कृषि तंत्रज्ञान प्रसार सप्ताह आयोजन**

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिनांक ९ ते १३ ऑक्टोबर, २००६ या कालावधीत कृषि तंत्रज्ञान प्रसार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.ना. श्री. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभ हस्ते दिनांक ९ ऑक्टोबर, रोजी करण्यात आले. दिनांक ११ ऑक्टोबर रोजी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास भारत सरकारचे कृषि मंत्री मा. शरदचंद्रजी पवार, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सप्ताहात शेतक-यांना पाहण्यासाठी विद्यापीठाच्या २६ हेक्टर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र विकसीत करण्यात आले होते. सप्ताहातील पाचही दिवस नामांकित तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्र या सदराखाली आयोजित करण्यात आली होती. या निमित्ताने भव्य कृषि प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्यात महाराष्ट्र आणि शेजारी राज्यातील कृषि विद्यापीठे, अखील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या संस्था, महाराष्ट्र शासनाने कृषि खाते तसेच इतर विभाग, खते, बी-बियाणे, औषधी, कृषि अवजारे, इ. चे निर्माते, आयात निर्यातदार, उद्योजक,बीगर सरकारी संस्था, स्वंयसेवी संस्था यांनी मोठया प्रमाणावर सहभागी होवून आपले तंत्रज्ञान शेतक-यांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिले. कृषि तंत्रज्ञान प्रसार सप्ताहास शासनाचे अनेक मंत्रीगण, अधिकारी, शेतकरी व विद्यार्थी यांनी भेटी दिल्या व समाधान व्यक्त केले. शेतक-यांचा प्रतिसाद लक्षात घेता असा उपक्रम दरवर्षी राबविण्याचा कृषि विद्यापीठाचा मानस आहे.

**८. तंत्रज्ञान प्रसारासाठी सामंजस्य करार**

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व आखील भारतीय संशोधन संस्था, नवी दिल्ली यांच्यात तंत्रज्ञान प्रसारासाठी दिनांक ३ सप्टेंबर, २००७ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या उपक्रमांतर्गत आय.ए.आर.आय. नवी दिल्ली या संस्थेने विकसीत केलेल्या विविध वाणांची पिक प्रात्यक्षिके घेण्यात आली. रबी हंगामात गहू, हरभरा व मोहरी या पिकांच्या वाणांची प्रात्यक्षिके घेण्यात आली. दोन्ही संस्थेच्या शास्त्रज्ञांच्या चमुने पीक प्रात्यक्षिकास वेळोवेळी भेटी देवूना मार्गदर्शन केले व वाणाची गुणवत्ता दाखवुन दिली.

**९. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी)**

विद्यापीठाच्या निरनिराळया उपक्रमात खाजगी क्षेत्राना पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप च्या माध्यमातुन सहभागी करून घेयात आले आहे. या उपक्रमांतर्गत निमित्त इंटरप्रायजेस, पुणे यांचे सोबत विद्यापीठ तंत्रज्ञानावर आधारित सीडी तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामध्ये भाजीपाला उत्पादना तंत्रज्ञान या विषयावरील सीडी प्रदर्शीत करण्यात आली आहे. विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या सहयोगाने तंत्रज्ञान प्रसार करण्यासाठी वनराई, पुणे या संस्थासोबतही सामंजस्य करार करण्यात आला आहे.

**संशोधन-विस्तार समन्वय**

मराठवाडा कृषि विद्यापीठ करीत असलेल्या संशोधनाचे उपयुक्त निष्कर्ष व आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांपर्यत पोहंचविण्याच्या दृष्टीने विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशिल आहे. यासाठी राज्य, विभाग, जिल्हा व ग्रामपातळीवर विद्यापीठ शास्त्रज्ञ आणि शासनाच्या कृषि व इतर संबधित विकास खात्यातील अधिकारी यांच्यात समन्वयक साधला जातो. राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शासनाच्या विकास खात्यातील अधिकारी यांच्यात संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीच्या माध्यमातुन दरवर्षी कृषि संशोधन व विस्तार याबाबत चर्चा करून शिफारशी केल्या जातात. विभागीय पातळीवर संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या हंगामी खरीप, रब्बी व उन्हाळी बैठका घेतल्या जातात. या बैठकीतून संशोधनाच्या निष्कर्षावर आधारित शिफारशी केल्या जातात. शिवाय त्या विभागातील शेतक-यांच्या गरजा लक्षात घेवून संशोधनाचा आराखडा निश्चित केला जातो. जिल्हा पातळीवर मासीक चर्चासत्राद्वारे एक खिडकी योजनेत काम करणा-या विषय विशेषज्ञ व उपविभागीय कृषि अधिकारी यांना संशोधन निष्कर्षावर आधारित प्रशिक्षण दिले जाते.

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संशोधनाचा व विस्तार कार्याचा तसेचत्याचा शेतक-यांकडून झालेल्याइ अवलंबनाचा दृष्य परिणाम म्हणजे मराठवाडयातील विविध पिकांच्या प्रतहेक्टरी उत्पादनात विद्यापीठ स्थापनेनंतर झालेली लक्षणिय वाढ होय.

**पुढील वाटचाल**

विकसीत तंत्रज्ञान व शेतक-यांकडून त्याचा प्रत्यक्ष वापर यामाील दरी कमी करण्यासाठी खालील अपेक्षित बद्ल नजरेसमोर ठेवून त्यांची अमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**१. लघु पट निमती (डाकुमेंट फिल्म)**

विद्यापीठाने विकसीत केलेले वाण, तंत्रज्ञान, विस्तार शिक्षण उपक्रम तसेच ठळक सोयी, सुविधा व घटनावर आधारीत लघूपट निर्मीत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**२. कमुनिटी रेडीओ केंद्र**

विस्तार शिक्षण उपक्रमांना गती देण्यासाठी विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कमुनिटी रेडीओ केंद्र स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या माहिती व प्रसार भारती विभागाकड विचाराधिन सादर करण्यात आला आहे. या रेडीओ केंद्राचा विद्यापीठच्या २५ कि.मी. पयैत परीसरातील शेतक-यांना लाभ होणार आहे.

**३. नवीन कृषि विज्ञान केंद्र स्थापना**

प्रत्येक जिल्हयासाठी कषि विज्ञान केंद्र शासानाची योजना लागू करण्यात आली आहे. त्याप्रमाणे मराठवाडयात आठय कृषि विज्ञान केंद्र कार्यरत आहेत. परंतू क्षत्रफळाच्या दृष्टीने मोठया जिल्हयात अतिरिक्त कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने प्रस्ताव मागविले आहेत. त्याप्रमाणे मराठवाडा विभागातील बिड जिल्हयातील खामगांव येथे, औरंगाबाद जिल्हयात वैजापुर येथे तर नांदेड जिल्हयात इसलापूर येथे विद्यापीठाची कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

**४. व्हीडीओ कॉन्फरंसीग**

विस्तार शिक्षण संचालनालयाच्या कार्यात गतिमैंनता आणण्यासाठी विद्यापीठाची कृषि विज्ञान केंद्र मुख्यालयाशी व्हीडीओ कॉन्फरसांगद्वारे जोडण्याचा मानस आहे.

**५. एसएमएस सुविधा**

शेतक-यांने विचारलेल्या प्रश्नांचे शंका समाधान त्याच्या भ्रमणध्वनीवर एसएमएसच्या माध्यमातून उत्तरे देवून शंकाचे निरसन करणे ही सुविधा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

**६. लघु कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र**

विद्यापीठात विकसित झालेल तंत्रज्ञान शेतक-यांसाठी एकाच छत्राखाली उपलब्ध करून देण्याच्या उदेशानं चारही विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्रावर लघु कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राची स्थापणा करणे गरजेचे आहे. या केंद्रात बी बीयाणे, रोपे , कलमे, कृषि प्रकाशने, औजारे यांची विक्री तसेच सल्लासेवा उपलब्ध करून देण्यात येईल.

**७. पीक प्रात्यक्षिक क्षेत्र**

विस्तार शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद येथील २० हेक्टर जमीन उपलब्ध आहे. शेतक-यांना पारंपारिक व अधुनिक कृषि तंत्रज्ञानाबाबत तुलनात्मक प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी सदरील ठिकाणी पीक प्रात्यक्षिक क्षेत्र उभारणी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक मनुष्यबळाने अर्थसहाय्य पुरविणे गरजेचे आहे.

**८. शेतीवर आधारित पूरक व्यवसाय**

शेतक-यांचा अर्थिक स्तर उंचावण्यासाठी शेतीवर अधारीत पूरक व्यवसाय जसे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, ककुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, शेळीपालन, आळंबी लागवड इ. बाबतीत प्रचार व प्रसार करून शेतकरी समुहाना हे व्यवसाय करण्यास प्रवृत्त करण्यात येईल. यासाठी विविध शेती पध्दती आधारित नमूने संशोधनातुन विकसित करण्यावर जोर द्यावा लागेल. सध्या मराठवाडा कृषि विद्यापीठात पीक पध्दतीवर आधारीत कृषि उत्पादन नमुने यावर संशोध्न चालू आहे. परंतु यापुढे जावून वरीलप्रमाणे शेती पध्दतीचे संशोधन करण्यावर भर देणे ही आजची गर आहे.

**९. शास्वत शेती**

या अभियानांतर्गत वैंतावरण आणि नैसर्गिक साधन सामुग्रीचा दर्जा टिकवून किंवा वाढवुन क्ष्याचा सुयोग्य वाजर कृषि जैव विविधतेचा वापर, कत्रिम निविष्ठांचा पूरक वापर, सेंद्रीय शेतीस चालना, पाणलोठ क्षेत्र विकास, पडीक जमीन विकास, एकात्मिक कीड व्यवस्थापन, एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक मूलद्रव्ये व्यवस्थापन इ. बाबींचा अवलंब करणे यावर भर देण्यात येईल. यामुळे शेतक-यांना कमी खर्चात जास्त उत्पादन घेणे शक्य होईल आणि नैसर्गिक साधन संपत्तीचेय आणि पर्यावरनाचे परिसंरक्षण ही होईल.

**१०. उच्च तंत्रज्ञानावर आधारीत शेती**

नजीकच्या भविष्यात उच्च तंत्रज्ञानावर आधारीत शेतीस महत्व येणार आहे यासाठी सेकरीत वाणाचा वापर, जणूकीय तंत्रज्ञानाद्वारे विकसित केलेले वाण, निविष्ठांचा अधिक परिणामकारक वापर, अपारंपारिक ऊर्जेचा वापर, सुपीक जमिनीचे संरक्षण, भूर्गर्भातील पाण्याचा काटकसरीने वापर ईत्यादी बाबतीत शेतक-यांची क्षमता वाढविण्यासाठी महत्वकांक्षी विस्तार शिक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल. परंतु यासाठी आधी सेंद्रीय शेती आणि इतर पर्यावरण पोषक तंत्रज्ञान यांच्या संशोधनावर भर द्यावा लागेल. मराठवाडा कृषि विद्यापीठाने यादृष्टने सुरूवात केली आहे.

**११. माहिती तंत्रज्ञान**

माहिती तंत्रज्ञान हे शेतीसाठी महत्वाचे साधन ठरले आहे. शेतक-यांसाठी उपयुक्त तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार, बाजार विषयक माहिती ग्रामस्तरा पयैत पोहचविण्यासाठी इंटरनेट, दुरदर्शन, आकाशवाणी या ईलेक्ट्रानिक माध्यमांचा जास्त वापर करण्यावर भर देण्यात येईल. कृषि तंत्रज्ञान माहीती केंद्र, परभणी येथे टच स्क्रीन सारखी सुविधा उपलब्ध करून देण्याचा माणस आहे. विविध पिकांच्या मशागतीच्या पद्रदती व इतर कृषि विषयक अद्यावत माहितीवर अधारित सी.डी. तयार करून शेतक-यांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

**१२. निर्यातक्षम शेती**

गॅट सारख्या आतरराष्ट्रीय करारामुळे भारत आता जागतिक बाजारपेठ आणि मुक्त अर्थ व्यवस्थेच्या कक्षेत आला आहे. या पार्श्वभूमीवर या विभागातील शेतक-यांनाही या मुक्त स्पर्धेत उतरणे अपरिहार्य आहे. जगाच्या पाठीवरील इतर देशात कृषिमध्ये झालेल्या प्रगतीमुळे व शेतक-यांना उपलब्ध करून दिलेल्या परदेशातील शेतकरी आपल्या शेतक-याच्या तुलनेत कमी खर्चात चांगल्या प्रकारचे शेती उक्ष्पादन करू लागले आहेत. कृषि उक्ष्पादनास निर्यात बाजारपेठेतील संधीचा फायदा मिळण्यासाठी सेंद्रीय शेती पध्दतीने कृषि माल उत्पादित करणे यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल. यासाठी केंपास्ट खत, गांडूळ खत निर्मितीवर भर देवुन सेंद्रीय शेतीचा प्रचार व प्रसार करून शेतकरी समुहांना प्रवृत्त करण्यात येईल. निर्यातक्षम मालाचे उत्पादन, अंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मालाचे निकष, निर्यात करणा-या संस्था, मालाचे प्रमाणिकरण करणा-या संस्था/प्रयोगशाळा, बाजाराची उपलब्धता, मालाची मागणी, प्रतवारी, पॅकिंग आणि एकूणच निर्याती अभिमुख तंत्रज्ञानाच्या विस्तारा वर भर देण्यात येईल.

**१३. कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग**

भारतीय कृषि क्षेत्रात महिला महत्वाची भूमिका निभावतात. ग्रामीण भारतातील महिला निर्विवादपणे आज भारतीय अर्थ व्यवस्थेला आकार देण्याचे काम करत आहे. कृषि क्षेत्रात काम करणा-या महिलांपैकी ३३.२ टक्के शेतकरी महिला आहेत. ४६.१९ टक्के शेतमजुर महिला तर १८.५ टक्के महिला पशु संवर्धन, वनीकरण, फलैंत्पादन आणि इतर कृषि क्षैंत्रामण्ये कार्यरत आहेत. परंतु कृषि उक्ष्पादनामध्ये महिला शेतक-याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे समाजाचा मोठा घटक कृषि सहभागापासुन वंचित राहिला आहे. स्त्रियांचा सहभाग केंद्रबिंदु मानुन विस्तार शिक्षण कार्यक्रम आखण्यात येतील. विशेषः महिला प्रशिक्षणावर भर देण्यात येईल त्यासाठी महिला प्रशिक्षण केंद्र उघडणेही गरजेचे आहे.

**१४. स्वंयरोजगार करणा-या कृषि पदवीधरांचे संघटन**

कृषि विद्यापीठातुन बाहेर पडलेले असंख्य पदवीधर ग्रामीण भागात शेती वा अनुषंगीक पूरक व्यवसाय करीत आहेत. अशा माजी विद्यार्थ्याच्या संघटना स्थापन करून त्याच्या मार्फत विस्तार कार्य करण्यावर भर देण्यात येईल. त्यासाठी विद्यापीठ सतरावर अलुम्नी असोशियशन स्थापन करण्यात येईल. अशा असोशियशनच्या माध्यामैंतून माजी विद्यार्थाचे विविध स्तरावरचे संघटन बळकट करता येईल. आणि त्याद्वारे विस्तार कार्य करणे सुलभ होईल.

**१५. कृषि माहिती केंद्र (इनफॉरमेशन शॉप)**

ग्रामीण भागात राहाण-या माजी कृषि पदवीधारकांना संगणकाण्धारित कृषि माहिती केंद्रासाठी वित्त पुरवठा करून त्यांना  स्वयंरोजगार तर पुरवता येईलच पण त्याच बरोबर जागतिक बाजारपेठ आणि निर्याती विषयी कमी दरात अद्यावत माहिती मिळेल. अशी माहिती केंद्रे खेडयांच्या समुहासाठी मोठया खेडयात वा टाउन प्लेसेसमध्ये उघडता येतील. अशी केंद्रे चालविणा-या पदवीधारकांना मार्गदर्शन करण्याचे काम विभागीय कृषि विस्तार केंद्रामार्फत केले जाईल.

**१६. जिल्हा कृषि विस्तार शिक्षण केंद्र**

मराठवाडयात सध्या चार विभागीया कृषि विस्तार शिक्षण केंद्र कार्यरत आहेत. मात्र यावर समाधान मानुन चालणार नाही. विद्यापीठाच्या विस्तार शिक्षणाची व्यापङ्कता वाढविण्यासाठी जिल्हा स्तरावर अशी केंद्र स्थापन करण्याची गरज आहे. या ठिकाणीवर नमुद केलेल्या  सर्व सुविधा पुरविण्यात येतील.

**१७. प्रशिक्षण केंद्र**

जिल्हास्तरावरील विस्तार केंद्राला जोडून प्रशिक्षणाचा विभागही कार्यरत असावा. या मार्फत विविध विषयांवर जिल्हयातील शेतक-यांना, तरूणांना, महिलांना नियमित प्रशिक्षण देण्याची व्यवस्था होईल.

परिशिष्ट-१

सन १९८० ते २००० या कालावधीत विविध योजनामार्फत घेतलेले विस्तार कार्यक्रम दशकनिहाय प्रगती

| अ.क्रं. | विस्तार कार्यक्रम | १९८० | १९९० | २००० |
|---|---|---|---|---|
| १ | पिक प्रात्यक्षिके | ७४ | १३५ | १५२ |
| २ | जिल्हा मासिक चर्चासत्र | - | ८२ | ८४ |
| ३ | निदान चमु भेटी | २५ | २२ | ४२ |
| ४ | शेतक-यांच्या शेतावर भेटी | १६० | १७५ | ३४३ |
| ५ | विस्तार कार्यकर्ते/शेतकरी प्रशिक्षण वर्ग | ३४ | ४६ | १९२ |
| ६ | शेतकरी मेळावे/आयोजन सहभाग | २५ | ४६ | १५० |
| ७ | गटचर्चा | ७२ | १८२ | २३८ |
| ८ | जिल्हा मासिक चर्चासत्रांतर्गत प्रक्षेत्र भेटी | - | ८२ | ८४ |
| ९ | शेतकरी/कर्मचारी/अधिकारी यांच्या केंद्रास भेटी | ३० (टिम) | ५० (टिम) | ७१ (टिम) |
| १० | दुरदर्शन कार्यक्रम | - | २० | २८ |
| ११ | आकाशवाणी कार्यक्रम | ६२ | ८२ | ८४ |
| १२ | कृषि प्रदर्शन | १० | ८२ | ८४ |
| १३ | प्रकाशने | | | |
| | १. कृषि दैनंदिनी | - | १०००० प्रति | २०००० प्रति |
| | २. माहिती पुस्तीका | २००० प्रति | १८००० प्रति | २०००० प्रति |
| | ३. घडीपत्रिका | ५००० प्रति | १६००० प्रति | १६००० प्रति |
| | ४. शेतीभाती | ९००० प्रति | १८००० प्रति | २२९००० प्रति |

परिशिष्ट-

सन २०००-०१ ते २००८-०९ या कालावधीत या संचालनालयांतर्गत विविध योजनांमार्फत घेतलेले वर्षनिहाय विस्तार कार्यक्रम

| अ.क्रं | विस्तार कार्यक्रम | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिक प्रात्यक्षिके | १७४ | १७१ | २१६ | २३५ | २१५ | २४५ | २१२ | २४६ |
| २ | जिल्हा मासिक चर्चासत्र | ८३ | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ९४ | ९५ |
| ३ | निदान चमू भेटी | २५ | २४ | ४० | ४२ | ६२ | ७२ | ११२ | १२६ |
| ४ | शेतक-यांच्या शेतावर भेटी व समस्येची सोडवणुक | ३१३ | ४०१ | ५३२ | ६८२ | ६४६ | ४२५ | ७८३ | ८१५ |
| ५ | विस्तार कार्यकर्ते/शेतकरी प्रशिक्षण वर्ग | ६४ | ७६ | २५८ | २६९ | २१४ | २८९ | २४९ | २२६ |
| ६ | शेतकरी मेळावे/आयोजन सहभाग | ४५ | ५६ | १७० | १८१ | ११० | १०४ | १३२ | १०७ |
| ७ | गटचर्चा | ११२ | १९२ | ३३८ | ४४८ | २७८ | २९० | १४१ | १४५ |
| ८ | मासिक संदेश | ६५ | ७१ | ५८ | ६२ | ८४ | ८४ | ९४ | ९५ |
| ९ | कृषि माहिती वाहिनी कार्यक्रम | - | - | - | ५१ | ९० | १०८ | १३२ | १३७ |
| १० | जिल्हा मासीक चर्चासत्रांतर्गत प्रक्षेत्र भेटी | ८३ | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ९४ | ९५ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | शेतकरी/कर्मचारी अधिकारी यांच्या केंद्रास भेटी | ४८ (टिम) | ६० (टिम) | ७५ (टिम) | ७७ (टिम) | ९० (टिम) | १५० (टिम) | १०० (टिम) | ७८ (टिम) |
| १२ | दुरदर्शन कार्यक्रम | २४ | २३ | ३४ | ३१ | ३५ | ३२ | ५२ | ५५ |
| १३ | आकाशवाणी कार्यक्रम | ६४ | ८१ | ९४ | १४४ | १४५ | १६८ | १४५ | १५० |
| १४ | कृषि प्रदर्शन आयोजन व सहभाग | १२ | १५ | १८ | १८ | १६ | १५ | १४ | १७ |
| १५ | कृषि माहिती वाहिनी | ४२८ | १२८६ | २४६२ | २९९२ | ३१०० | ३२०० | ३२१९ | ३५९६ |
| १६ | किसान कॉल सेंटर | - | - | - | ८४ | ११८ | ११० | २१० | ३१४ |
| १७ | पश्चिम विभागीय कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळावा | - | - | - | - | ०१ | - | - | - |
| १८ | कृषि तंत्रज्ञान प्रसार सप्ताह | - | - | - | - | - | -०१ | - | - |
| १९ | प्रकाशने | | | | | | | | |
| | १. कृषि दैनंदिनी | १०००० प्रति | १०००० प्रति | १०००० प्रति | १०००० प्रति | १३००० प्रति | १५००० प्रति | १५००० प्रति | १५००० प्रति |
| | २. माहिती पुस्तीका | २२००० प्रति | २५००० प्रति | २८००० प्रति | ३०००० प्रति | ३६००० प्रति | ३७५०० प्रति | ३९००० प्रति | ३८००० प्रति |
| | ३. घडीपत्रिका | १४००० प्रति | १६००० प्रति | १६००० प्रति | १०००० प्रति | १२००० प्रति | १३००० प्रति | १४००० प्रति | २०००० प्रति |
| | ४. शेतीभाती | २०२५० प्रति | २२००० प्रति | २२५०० प्रति | २२५०० प्रति | २५००० प्रति | २६३०० प्रति | २८२५० प्रति | २६००० प्रति |